# ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

(विद्युत कायदा, २००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जळगाव परिमंडळ

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच
जुनी एम.आय.डी.सी.
अजिंठा चौफुली
जळगाव – ४२५ ००३

दुरध्वनी क्र. ०२५७ – २२७३००४
Email :-cgrfjalgaonzone@gmail.com
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

जा.क्र: स.स./ग्रागानिमं/जप/ज.मं./भुसावळ/१५–२०१४/ No 00022 दिनांक : २०/ ०३/२०१५

(रजिष्टर पोच व्दारे)

गाऱ्हाणे दाखल दिनांक: ०९/०२/२०१५
निकाल दिनांक : २०/ ०३/२०१५

प्रति,

१) श्री चरण चंद्रबली यादव
प्लॉट नं. १४,स.नं. ८/२, गोपालनगर,
गांधीनगर, भुसावळ. जि.जळगाव.पिन–४२५२०१
(ग्राहक क्र. ११७७५०६२६७९८) } तक्रारदार

२) म. नोडल अधिकारी,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.
मंडळ कार्यालय,विद्युत भवन,
जळगाव

३) म. कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.
विभागीय कार्यालय,भुसावळ
ता.भुसावळ. जि.जळगाव } वितरण कंपनी

सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, म.रा.वि.वि.कं. मर्या.,जळगांव

## निर्णयपत्र

श्री. चरण चंद्रबली यादव, रा.प्लॉट नं. १४,स.नं. ८/२, गोपालनगर, गांधीनगर, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव हे विज वितरण कंपनीचे घरगुती ग्राहक आहेत. त्यांना म.रा.विज वितरण कंपनीकडून माहे सप्टेंबर २०१४ मध्ये ८७८८ युनिटचे १,०४,७६२.०६ रूपये इतके बील देण्यात आले. या विषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीकडे दि. २४.११.२०१४. रोजी तक्रार दाखल केली. परंतु अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीचा निकाल हा ग्राहकाला मान्य नसल्यामुळे निकालाविरोधात आपले गाऱ्हाणे त्यांनी अनुसुची 'अ' मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे आवक क्रमांक ०८ अन्वये दि. ०९.०२.२०१५. रोजी नोंदविण्यात आले.

मंचाशी सल्लामसलत करून हे प्रकरण सुनावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. गाऱ्हाणे अर्जाची सुनावणी वितरण कंपनीच्या अजिंठा रोड वरील विश्रामगृहात दि. १३.०३.२०१५ रोजी स. ११.३० वाजता निश्चित करण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि. २५.०२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी,जळगाव मंडळ



Scanned by CamScanner

कार्यालय,जळगाव व कार्यकारी अभियंता, भुसावळ विभाग यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसात मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोहचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनी तर्फे श्री.एस.सी वानखेडे. अतिरिक्त कार्यकारी अभियतां भुसावळ विभाग, तसेच श्री सी.ए.सोनवणे. सहाय्यक लेखापाल, भुसावळ विभाग हे उपस्थित होते. तर श्री राजु भोंगाडे, नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मंडल कार्यालय , जळगाव हे उपस्थित होते. ग्राहक श्री. चरण चंद्रबली यादव हे स्वतः उपस्थित होते.

**ग्राहकाची बाजु :**

ग्राहकाने आपली बाजू थोडक्यात खालीलप्रमाणे मांडली:

१. ग्राहकाला माहे सप्टेंबर–२०१४ साठी महावितरण कंपनी कडुन ८७८८ युनीट्सचे १,०४,७६२.०६ रूपये असे बील देण्यात आलेले आहे.

२. त्या आधी मागील चार महिन्यासाठी ५४ युनीट प्रमाणे सरासरी बीले देण्यात येत होते. त्यावेळेस तशी तक्रार दि. १७.०७.२०१४ रोजी ग्राहकाने उपविभागीय कार्यालय (शहरी विभाग ) येथे दिली होती.

३. ग्राहकाच्या घरात रोलेक्स कंपनीचा (मीटर क्र.५८०१३६३९८२) मीटर बसविण्यात आला होता.

४. ते मीटर माहे मे २०१४ पासुन सप्टेंबर २०१४ पर्यंत वेगाने व चुकीची वीजगणना करत होते . परंतु दि.२०.११.२०१४ रोजी मीटर टेस्टींग कक्ष येथे ते मीटर बरोबर दाखविण्यात आले.

५. पाच महिन्याकंरीता घरगुती वापर ९००० युनिट पर्यंत होवु शकत नाही. दि. ०५.११.२०१४ रोजी ग्राहकाचे मीटर बदलण्यात आले . आजपर्यंत १८ दिवसांचा वापर फकत ३५ युनिट झालेले आहेत .

६. तसेच मी आपणास कळवु इच्छितो की, वीज पुरवठा घेतल्यापासुन घरगुती वापर १५० केडब्ल्युएच (युनिट) प्रतिमहा पेक्षा जास्त झालेला नाही. तसेच माहे मे २०१४ ते सप्टेंबर २०१४ पर्यंत ग्राहकाच्या घरी कोणताही लग्न किंवा धार्मिक कार्यक्रम सुध्दा नव्हता.

**ग्राहकाची मागणी :**

माहे सप्टेंबर–२०१४ ला चुकीचे बील देण्यात आलेले आहे. तरी हे बील (देयके) घरातील भाराप्रमाणे किंवा आजपर्यत देण्यात आलेल्या देयकांचा विचार करून देण्यात यावे.

**वितरण कंपनीची बाजु :**

मंचाने सूचित करूनही वितरण कंपनीचे संबंधीत नोडल अधिकारी यांनी याबाबत मंचाला व ग्राहकाला सुनावणीपर्यंत कुठलेही लेखी उत्तर सादर केले नाही. मात्र कार्यकारी अभियंता, भुसावळ विभाग यांनी पत्र दि. ०७/०३/२०१५ द्वारे मंचाला थेट उत्तर दिले आहे. या पत्रासोबत सी.पी.एल. व स्थळ पाहणी अहवाल व इतर पत्रव्यवहार मंचापुढे सादर केला. नोडल अधिकारी यांनी याबाबत लेखी उत्तर मंचाला दि. १३.०३.२०१५ रोजी सुनावणी आटोपल्यानंतर दु. २.३० वाजता मंचास सादर केले आहे. त्यानुसार व कार्यकारी अभियंता भुसावळ विभाग यांनी सादर केलेल्या खुलाशाप्रमाणे:

१. श्री. यादव चरण चंद्रबली ग्रा,क्र. ११७७५०६२६७९८ यांचे विज कनेक्शन दि.०७.०३.२०१२ रोजी बसविण्यात आले असुन सदर ग्राहकास माहे सप्टेंबर २०१४ मध्ये ८७८८ विज युनिटचे देयक (बील फॉर ५ मन्थ) आकारण्यात आलेले आहे. माहे ऑगस्ट २०१४ ची बी–३० व्हॅलीडेशन ऐरर रिपोर्ट तपासणी करीत असतांना चालु मिटर वाचन ९७४० व मागील मिटर वाचन ११९० असे होते त्यामुळे ग्राहकास ८६३० विजवापराचे विजदेयक (अॅबनॉर्मल) होणार असल्याने ग्राहकाचा स्थळपरिक्षण अहवाल पत्र क्र. अतिकाअ/शउवि/बिलींग/भुसावळ/२०३६ दि.०१.०९.२०१४ ने मागविण्यात आला.

२. परंतु स्थळपरिक्षण अहवाल वेळेत न मिळाल्यामुळे माहे ऑगस्ट २०१४ चे इनअॅक्सेस सरासरी विजवापराचे देयक आकारण्यात आले. त्या नंतर सदर ग्राहकाचा स्थळ परिक्षण अहवाल दि. ०६.०९.२०१४. रोजी प्राप्त झाला. त्यात ग्राहकाचे चालु मीटरवाचन ९७८१ असे होते. त्यानंतर माहे सप्टेंबर २०१४ मध्ये ग्राहकास मागील वाचन ११९० ते चालु वाचन ९८९८ (फोटो रिडींगनुसार) असे एकुण ८७८८ विजयुनिटचे विजदेयक आकारण्यात आले.



Scanned by CamScanner

३. त्यानंतर ग्राहकाचे विजमीटर दि. २०.११.२०१४ रोजी तपासणी करण्यात आले. मीटर तपासणी अहवाल दि. २१.११.२०१४ नुसार सदर विजमीटर Ok Within Limit असे नमुद केलेले आहे. ग्राहकाचे विजमीटर दि.०४.११.२०१४ रोजी पत्र दि. ०७.११.२०१४. नुसार बदलविण्यात आलेले आहे. त्यानंतर शिवाजी नगर कक्षाकडुन ग्राहकाच्या नविन विजमीटरचा स्थळ परिक्षण अहवाल दि.२०.१२.२०१४ ला चालु मीटर वाचन ८० असे आहे. नंतर अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण केंद्र यांनी दिलेल्या सूचनेनुसार अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळपरिक्षण करून दि. ०३.०२.२०१५ ला अहवाल सादर केला. त्यानुसार चालु मीटर वाचन १६० असे आहे.
४. ग्राहकाने दि.२४.११.२०१४. रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण केंद्र, सर्कल कार्यालय जळगाव. येथे घराचा लोड प्रमाणे बिल दुरूस्त करून मिळणेबाबत तक्रार केलेली होती. त्यावर कार्यवाही होवुन अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण केंद्र, सर्कल कार्यालय जळगाव यांचे पत्र क्र. अअ/जळगाव/आयजीआरसी/४७० दि.०४.०२.२०१५ रोजी दिलेल्या आदेशात माहे सप्टेंबर २०१४ चे आकारणी केलेले ८७८८ विज युनिटचे देयक मीटरवाचनाप्रमाणे असुन ते बरोबर आहे असे नमुद करून अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे.
५. यावरून ग्राहकास आकारणी केलेले विज देयक ग्राहकाच्या मीटरवाचनप्रमाणे असुन ते बरोबर आहेत.
६. आपणास विनंती की ग्राहकाचा तक्रार अर्ज खारीज करून आकारलेले विजबिल योग्य असल्याचे आदेश व्हावे ही विनंती.

**अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीची कारवाईः**

१. ग्राहकाने दि. २४.११.२०१४ रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण केंद्र, सर्कल कार्यालय जळगाव येथे तक्रार केली होती.त्या नुसार दि. ०४.०२.२०१५ रोजी सुनावणी घेण्यात आली.
२. अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण समितीने दि.०४.०२.२०१५ च्या पत्रान्वये सदरील अर्जावर खालील निर्णय दिलाः *"मीटरमध्ये जे मीटर रीडींग फिरलेले आहे. त्यात माहे सप्टेंबर २०१४ मध्ये ग्राहकास आकारलेले ८७८८ युनिट पाच महिन्यात विभागणी करून दिले आहे. त्यानुसार ग्राहकास जे प्रत्यक्ष वापरानुसार जे युनिट दिसत आहे ते ग्राह्य धरता येत नाही, कारण मिटरने वापरलेले युनिट दाखविले आहे व ते बरोबर आहे. त्यानुसार ग्राहकाचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे."*

**मंचाचे निष्कर्ष :-**

१. प्रस्तुत प्रकरणी नोडल अधिकरी तथा कार्यकारी अभियंता, जळगाव मंडळ कार्यालय यांना मंचाने दि. २५.०२.२०१५. ला पत्र देऊन सदर तक्रारीवर मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसाचे आत मागितला होता व त्याची प्रत ग्राहकास देण्याचे सुचित केले होते. मात्र संबंधित नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जळगाव, मंडळ कार्यालय यांनी कुठलेही प्रतिनिवेदन सादर केलेले नाही. <u>याबाबत मंचाने खेद व्यक्त करून पुढील तक्रारीचे वेळी काळजी घ्यावी असे संबंधीत नोडल अधिकारी यांना सुचित केले.</u>
२. सदर ग्राहकाला वीज पुरवठा दि. ०७.०३.२०१२ पासून दिलेला आहे. ग्राहकाचा ऑगस्ट २०१२ ते नोव्हेंबर २०१४ पर्यंतचे सी.पी.एल. वितरण कंपनीने सादर केले आहे. तसेच ऑगस्ट २०१३ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीतील (मे २०१४ वगळता) मीटर वाचन फोटोच्या संगणकीय प्रती सादर केल्या आहेत. मे २०१४ च्या फोटोबाबत विचारणा केली असता अतिरिक्त कार्यकारी अभियंता , भुसावळ शहर उपविभाग यांनी असे कळवले आहे की सदर फोटा डाटा करप्ट झाला असल्याने मे २०१४ चा फोटो देता येत नाही.
३. सदर ग्राहकास सप्टेंबर २०१४ मध्ये चालू रीडिंग ९८९८ दाखवून ५ महिन्यांच्या ८७८८ युनीट्स वीज वापराचे रु. १,०४,७६०/- चे देयक देण्यात आले आहे. वितरण कंपनीने दि. २१.११.२०१४ रोजी केलेल्या तपासणीत मीटर क्र. १३६३९८२ हे ओके दाखवण्यात आले आहे.
४. ग्राहकाने दि. १७.०७.२०१४ रोजी सहाय्यक अभियंता यांच्या नावे एक अर्ज देऊन असे निवेदन केले आहे की त्यांच्या मीटरवर डिसप्ले येत नाही . त्याबाबत उचित कारवाई करावी. पण यासंबंधी त्यावेळी वितरण कंपनीने काही कारवाई केली नाही.



Scanned by CamScanner

५. सी.पी.एल. व मीटर वाचन फोटोच्या संगणकीय प्रतींचे अवलोकन केले असता खालील विसंगती आढळल्या आहेत:

| महिना | फोटोप्रमाणे मीटर वाचन | सी.पी.एल. प्रमाणे नोंद | शेरा |
|---|---|---|---|
| डिसेंबर २०१३ | ०००० | ८२४ | सी.पी.एल. वर मीटर इनएक्सेस नमूद केले आहे. |
| मे २०१४ | फोटो उपलब्ध नाही. | १११० | सी.पी.एल. वर मीटर इनएक्सेस नमूद केले आहे. |
| जुन २०१४ | ९५२२ | १११० | सी.पी.एल. वर मीटर इनएक्सेस नमूद केले आहे. |
| जुलै २०१४ | ९६२० | १११० | सी.पी.एल. वर मीटर इनएक्सेस नमूद केले आहे. |
| ऑगस्ट २०१४ | ९७४० | १११० | सी.पी.एल. वर मीटर इनएक्सेस नमूद केले आहे. |
| ऑक्टोबर २०१४ | फोटो उपलब्ध नाही | ९८९८ | सी.पी.एल. वर आरएनटी नमूद केले आहे. |

- मीटर जर योग्यरीत्या कार्य करीत असेल तर नोव्हेंबर २०१३ मध्ये रीडिंग ८२४ नोंदवलेली असताना डिसेंबर २०१३ चे मीटरवर चालू रीडिंग ०००० कसे आले याचा उलगडा होत नाही.
- मे २०१४ चा मीटर फोटो त्या महिन्याच्या देयकावर दाखवलेला आहे . मात्र त्यावरील रीडिंग स्पष्ट दिसत नाही. मीटर इनएक्सेस असे नमूद केले आहे. हा फोटो करप्ट झाला असे वितरण कंपनीने कळवले आहे.
- जुन ते ऑगस्ट २०१४ या तीन महिन्यांसाठी प्रत्यक्षातील फोटो मीटर रीडिंग उपलब्ध असताना सी.पी.एल. वर मीटर इनएक्सेस असे नमूद केले व एप्रिल २०१४ चीच चालू रीडिंग दाखवली आहे.
- वितरण कंपनीने जरी सप्टेंबर २०१४ ला चालू रीडिंग ९८९८ अशी नोंदवली असली तरी प्रत्यक्षात जुन २०१४ पासूनच ९५०० च्या वर मीटर रीडिंग मीटरवर नोंदवल्या गेल्या आहेत. मे २०१४ चा फोटो उपलब्ध नाही.त्यामुळे त्या महिन्याची प्रत्यक्षातील मीटर रीडिंग उपलब्ध नाही. तीही अवास्तव असण्याची शक्यता नाकारता येत नाही.
- वितरण कंपनीने सादर केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसते की ऑगस्ट २०१४ च्या मीटर रीडिंग तपासल्या असता उपविभागीय कार्यालयाचा असे लक्षात आले की सदर ग्राहकाची मीटर रीडिंग ९७४० असून त्यांना अवाजवी बिल जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनी संबंधित कंक्ष अभियंता यांना चेक रीडिंग घेण्याचे आदेश पत्र दि. ०१.०९.२०१४ द्वारे दिले. वास्तविक ९५२२ अशी अवास्तव रीडिंग जुन २०१४ ( जी मे २०१४ मध्येही असण्याची शक्यता आहे) मध्येच फोटो मध्ये नोंदवली गेलेली आहे. जुन २०१४ मध्येच अशी कारवाई उपविभागीय कार्यालयाने करायला हवी होती.

६. या तपशिलावरून असे दिसते की एप्रिल २०१४ या महिन्यात मीटर वरील चालू रीडीग १११० होती ती जुन २०१४ मध्ये ९५२२ झाली . याचा अर्थ केवळ दोन महिन्यात (९५२२-१११०)=८४१२ युनीट्स वापर झाला. म्हणजे दरमहा ४२०६ युनीट्स ( प्रती दिन १४० युनीट्स ) एवढा वापर मे २०१४ व जुन २०१४ या महिन्यात झाला. प्रती दिन १४० युनीट्स वापर होण्यासाठी ५.८ कि. वॅ. वीजभार २४ तास वापरला असला पाहिजे. भारनियमनामुळे या भागात २४ तास वीज उपलब्ध नाही. त्यामुळे हा वापर अवास्तव वाटतो. केवळ दोन महिन्यात ८४१२ युनीट्स वापर नोंदवल्यामुळे हा वापर अनेक महिन्यांचा संचित (Accumulated) असण्याची शक्यताही गृहित धरता येत नाही.

७. ग्राहकाचा स्थळ पाहणी अहवाल वितरण कंपनीने दि. ०३/०२/२०१५ ला केला असून त्यानुसार ग्राहकाचा जोडभार १.८६ कि. वॅ. या आधारावर मासिक वीज वापर १८० युनीट्स आहे. पुरवठा दिनांकापासून ( ७ मार्च २०१२) ते एप्रिल २०१४ पर्यंत (२६ महिने) एकूण १११० युनीट्स वापर आहे. जो सरासरी मासिक ४३ युनीट्स इतका आहे. ग्राहकाचे मीटर क्र. १३६३९८२ हे ४ नोव्हेंबर २०१४ ला बदलले. मीटर बदली अहवालात त्यावेळची अंतिम रीडिंग ९९५४ नोंदवली आहे. हे मीटर बदलल्यावर नवीन मीटरवर नोव्हेंबर २०१४ (रीडिंग -०१) ते फेब्रुवारी २०१५ ( रीडिंग- २०१) पर्यंत ४ महिन्यात एकूण २०० युनीट्स वापर नोंदवला आहे . यात मागील



Scanned by CamScanner

मिटरचा शिल्लक (९९५४-९९४८) ५६ युनीट्स वापर समायोजित केल्यास ४ महिन्यांचा एकूण वीजवापर (५६+२००) २५६ युनीट्स एवढा येतो. जो मासिक सरासरी ६४ युनीट्स इतका आहे.

८. ग्राहकाचा प्रत्यक्ष जोडलेला वीजभार, मार्च २०१२ ते एप्रिल २०१४ या कालावधीचा प्रत्यक्ष वीजवापर, नोव्हेंबर २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीचा वीजवापराचा कल, मे २०१४ किंवा जुन २०१४ महिन्यात अचानक मोठा वीजवापर होण्याचे नसलेले कुठलेही संयुक्तिक कारण व सी.पी.एल. च्या नोंदीबाबतची विसंगती हे लक्षात घेता , सदर मीटर क्र. १३६३९८२ हे नंतरच्या तपासणीत जरी ओके आढळले असले तरी या मिटरवरील मे २०१४ किंवा जुन २०१४ या महीन्याच्या रीडिंग व त्यामुळे पुढील रीडिंग्ज वादीत ठरतात. ही रीडिंग मीटर मधील तात्कालिक तांत्रिक दोषामुळे निर्माण झाली असावी, असे मानण्यास वाव आहे. त्यामुळे मे २०१४ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीसाठी वीजवापराचे पुर्निर्धारण करणे गरजेचे आहे.

९. मे २०१४ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीतील दोषपूर्ण रिडिंग्जमुळे हे मीटर सदोष मानून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५ च्या विनियम १५.४.१ च्या आधारावर मे २०१४ पूर्वीच्या १२ महिने आधीच्या ( मे २०१३ ते एप्रिल २०१४) वीजवापराच्या सरासरीवर आधारित सुधारित देयक या कालावधीसाठी तयार करावे, असे मंच सूचित करीत आहे.

ग्राहकाचे प्रतिनिवेदन , विद्युत वितरण कंपनीचा खुलासा व सादर करण्यात आलेली कागदपत्रे या सर्व बाबींचा विचार करून मंच या प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. वितरण कंपनीने मे २०१३ ते एप्रिल २०१४ या १२ महिन्यात मीटरवर नोंदल्या गेलेल्या विजेच्या सरासरी वीजवापरावर आधारित सुधारित देयक विलंब शुल्क व व्याज न लावता मे २०१४ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीसाठी या आदेशाच्या दिनांकापासून २० दिवसाचे आत तयार करावे.

२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील नियम क्र. ६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाच्या पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यांवरील कारवाईचा अहवाल मंचाकडे एक महिन्याच्या आत सादर करावा.

३. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अमंलबजावणी न केल्यास म.वि.नि.आ. (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. २२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागू शकतात.

४. या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र. १७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे , (व्दारा - महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ "केशवा" बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई-४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

| | | |
|---|---|---|
| —सही— | —सही— | —सही— |
| **बिभीषण सु. निर्मळ** | **राजन सि. कुलकर्णी** | **सुरेश पां. वाघ** |
| सदस्य-सचिव | सदस्य | अध्यक्ष |

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, जळगाव परिमंडळ**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.(मर्या.), विद्युत भवन, परिमंडळ कार्यालय, जळगांव

२. अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं.(मर्या.) मंडळ कार्यालय,जळगांव

Executive Engineer(CGRF)
M. S. E. D. Co. Ltd.
Jalgaon Zone



Scanned by CamScanner